अर्ज नमूना

फोटो

**महिला व बाल विकास विभाग ,जिल्हा परिषद ,परभणी**

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना**

**जि.प.उपकर सन 2025-26 मध्ये ग्रामीण भागातील मुली व महिलाना व्यवसायीक व तांत्रिक प्रशिक्षण देणे या योजने अंतर्गत शिलाई मिशन व फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण देणे .**

प्रति,
मा. बाल विकास प्रकल्प अधिकारी ,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
प्रकल्प :-

विषय :- ग्रामीण भागातील मुली व महिलाना व्यवसायीक व तांत्रिक प्रशिक्षण देणे या योजने अंतर्गत शिलाई मिशन व फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण मिळणे बाबत .

महोदय,

महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद परभणी मार्फत मुली/ महिलाना योजना 2025-26 अंतर्गत शिलाई मिशन व फॅशन डिझायनिंग प्रशिक्षणसाठी मी हा अर्ज करीत आहे.

1. अर्जदाराचे पूर्ण नाव :-
   लग्ना नंतर चे नाव:-
2. गावाचे नाव व पत्ता :-
3. वय :-
4. शैक्षणीक अहर्ता :-
5. वार्षिक उत्पन्नाचा दाखला :-
6. अर्जदार महिला विवाहित /अपंग /घटस्फोटीत /परितकत्या यापैकी असल्यास नमूद करावे -
7. सदर योजनेचा लाभ अन्य विभागाकडून घेतला आहे किवा नाही -

**उपरोक्त योजनेचा लाभ मिळण्यासाठी मी खालील प्रमाणे कागदपत्रे जोडलेली आहेत.**

- बॅंक पास बूकची झेरॉक्स प्रत व आधार कार्ड झेरॉक्स
- दारिद्र्य रेषेखालील असल्याचा दाखला/वार्षीक उत्पन्नाचे मागील वर्षाचा दाखला.
- रेशन कार्डची झेरॉक्स
- यापूर्वी प्रशिक्षण घेतले नसल्याचे स्वयघोषणापत्र
- शौचालय वापरत असल्याबाबत स्वयघोषणापत्र
- प्रशिक्षण शुल्काच्या 10% रक्कम भरण्यास तयार असल्याचे हमीपत्र
- जातीचे प्रमाणपत्र/अपंग/घटस्फोटित/परितक्त्या प्रमाणपत्र (लागू असल्यास)

**वरील योजनेचा** लाभ मिळण्यासाठी मी माझे कुटुंबा बाबतची माहिती वरील प्रमाणे सादर केली आहे. सदर **माहिती खरी असून** योजनेचा लाभ मिळण्यासाठी विभागाने विहित केलेले अटी व नियम मला मान्य आहे. व **माझ्या वर बंधनकारक** राहतील. त्या अटी व शर्तीस अधीन राहून लाभ मिळावा ही विनंती.

(अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी)

**महिला व बाल विकास विभाग ,जिल्हा परिषद ,परभणी**

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना**

**जि.प.उपकर सन 2025-26 मध्ये ग्रामीण भागातील मुली व महिलाना व्यवसायीक व तांत्रिक प्रशिक्षण देणे या योजने अंतर्गत शिलाई मिशन व फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण देणे .**

## योजनेच्या अटी व शर्ती

1. शिलाई मशीन व फॅशन डिझायनिंग प्रशिक्षणाचे प्रस्ताव बा.वि.प्र.अ.तालुका कार्यालयात सादर करावेत
2. कमीत कमी 07 वि पास असलेल्या ग्रामीण भागातील मुली/महिलेस प्रशिक्षण देता येईल
3. प्रशिक्षणार्थी चे रहिवाशी प्रमाणपत्र /स्वयघोषणापत्र
4. प्रशिक्षणार्थीच्या पालकांचे/पतीचे सन 2024-25 चे वर्षीक उत्पन्न रुपये 120000/-च्या आत किंवा दारिद्र्य रेषेखालील असावे. (उत्पन्न प्रमाणपत्र तहसीलदार ) दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी यांनी दिलेले असावे व त्यावर सबंधित गटविकास अधिकारी यांनी प्रमाणित केलेले असावे .
5. मागासवर्गीय लाभार्थीनी त्यांना सक्षम आधिक्य-यानी दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत
6. यापूर्वी या योजनेचा लाभ न घेतल्याचे स्वयघोषणापत्र
7. लाइट बिल
8. आधार कार्ड
9. शोचालय वापरत असल्याबाबत चे प्रमाणपत्र / स्वयघोषणापत्र
10. प्रशिक्षण घेणार असल्याबाबत चे हमीपत्र
11. विहित नमुन्यातील अर्ज यासोबत जोडण्यात येत असून त्यात नमूद सर्व बाबीची पूर्तता करण्यात यावी व सर्व लाभार्थीचे प्रस्ताव त्यात नमूद प्रमाणे सर्व प्रमाणपत्रे व हमीपत्रे जोडूनच सादर करण्यात यावेत.
12. सदरचे प्रस्ताव सन 2025-26 साठी ग्राहय धरण्यात येतील
13. निधीच्या उपलबद्धते प्रमाणे लाभयार्थ्याची रेंडमली निवड करण्यात येईल निवडण्यात आलेल्या शासन मान्यता प्राप्त संस्थेत संगणक प्रशिक्षण घेणे अनिवार्य राहील .
14. प्रशिक्षण शुल्काच्या 10% रक्कम भरण्यास तयार असल्याचे हमीपत्र देणे अनिवार्य राहील.
15. योजेनेच्या अटी व शर्थीत बदल करण्याच्या अधिकार या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)
जिल्हा परिषद परभणी

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद परभणी

आज़ादी का अमृत महोत्सव

बेटी बचाओ बेटी पढाओ

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद परभणी
नवीन जिल्हा परिषद इमारत , दूसरा मजला, परभणी 431401
email :dyceoicdspbn22@gmail.com

जाक्र/जिप/बाक/आस्था-2/कावि/~~1507~~/2026 11 दिनांक- ~~29/09/2025~~ 05/01/2026

प्रति.

बाल विकास प्रकल्प अधिकारी
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
प्रकल्प: सर्व पाथरी

विषय :- जिल्हा परिषद स्वउत्पन्न सन 2025-26 या वित्तीय वर्षात ग्रामीण भागातील मुली व महिलांना व्यवसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी प्रसिध्दी देणे बाबत च्या योजनेला मुदतवाढ देणे बाबत.

संदर्भ :-1) जाक्र/जिप/बाक/आस्था-2/कावि/1354/2025महिला व बालविकास विभाग जि.प.परभणी दिनांक-30/10/2025
2) जाक्र/जिप/बाक/आस्था-2/कावि/1502/2025महिला व बालविकास विभाग जि.प.परभणी दिनांक-18/12/2025
3) जाक्र/जिप/बाक/आस्था-2/कावि/1533/2025महिला व बालविकास विभाग जि.प.परभणी दिनांक-29/12/2025

उपरोक्त संदर्भीय 1,2 व 3 विषयान्वये जिल्हा परिषद स्वउत्पन्न सन 2025-26 या वित्तीय वर्षात ग्रामीण भागातील मुली व महिलांना व्यवसायिक व तांत्रिक प्रशिक्षण अंतर्गत **शिलाई मशीन व फॅशन डिझाईनिंग** चे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने सदर प्रशिक्षणाचे फॉर्म दिलेल्या मुदतीती प्राप्त झाले नाहीत त्यामुळे प्रशिक्षण फॉर्म स्वीकारण्याच दिनांकास मुदतवाढ देण्यात येत आहे. प्रशिक्षणाचे फॉर्म स्वीकारण्याच दिनांक:- **05/01/2026 ते 09/01/2026** पर्यंत सुट्टीचा दिवस वगळून बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या मार्फत सादर करावेत .

तरी सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी योजनेबाबत आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर सदर योजनेचे प्रसिध्दी देण्यात यावी तसेच आपल्या अधिनस्त सर्व अंगणवाडी सेविका यांच्या मार्फत सदर योजनेची प्रसिध्दी देण्या संदर्भात सुचित करावे व केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत : अर्जाचा नमुना.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)
जिल्हा परिषद परभणी

प्रतिलीपी :-1) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. परभणी यांना माहितीस्तव सविनय सादर.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)
जिल्हा परिषद परभणी